नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ४**
**जुलै २०१०**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. १६ जुलै २०१० रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

<u>विषय क्र. १२९</u>

संदर्भ :– १) मा. कक्ष अधिकारी पत्र जावक क्र. विसप्र/पी.एम.सी.–३०१०/४७९/प्र. क्र. – १०३/ नवि २२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ३०/३/२०१०.
२) मा. महा. आयुक्त यांचे जा. क्रं. मआ/पापु मलनि/६५ दि. ६/५/२०१० चे पत्र.
३) मा. अॅड्. निलेश निकम, सभागृह नेता व मा. बंडु गायकवाड यांची दि. ८/६/२०१० ची उपसूचना.
४) स्थायी समिती ठराव क्र. २६६, दि. ८/६/२०१०.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेबरोबर पुणे शहरासाठी आवश्यक असलेल्या पाणी वापरासाठी करावयाच्या कराराबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) जलसंपदा विभाग व पुणे महानगरपालिका यांचे दरम्यान पाणी वापराबाबत करावयाच्या प्रचलित करारास पश्चात मान्यता देण्यास

२) भविष्यात जलसंपदा विभाग व पुणे महानगरपालिका यांचे दरम्यान पाणी वापराबाबत करार करण्याचे मसुद्यास स्थायी समितीची मान्यता घेणेस

३) शासन निर्णयानुसार वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या दरानुसार पाणी वापराची देयके जलसंपदा विभागाकडे आदा करण्यास

<u>विषय क्रं. १३०</u>

संदर्भ :– १) मा.स्थायी समिती ठराव क्र. ९८५ दि. २१/१०/१९९७.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/भूप्रा/११४ दि. ३/६/२०१० चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. २९८, दि. ८/६/२०१०.

–––

मा. महा. आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

कळस स. नं. ११५ पैकी अस्तित्वातील असलेल्या स्मशानभूमीला लागून ३ एकर जागा वाढीव स्मशानभूमीसाठी संपादन करण्यास संदर्भांकित पत्रान्वये मा.स्थायी समितीच्या ठरावान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे यांचेकडे वाढीव स्मशानभूमीसाठी दाखल केलेला असून सदरचा भूसंपादन प्रस्ताव चालू आहे. सदर प्रकरणी मान्य विकास योजना आराखड्यानुसार नियोजित वाढीव स्मशानभूमीसाठी काही भागास निवासी क्षेत्र व काही भागात ग्रीन बेल्ट आहे यास्तव सकृतदर्शनी सदरचा प्रस्ताव हा विकास योजना बाह्य प्रस्ताव होत आहे.

सद्यस्थितीत सदर प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूमी संपादन अधिकारी क्र. १५ यांचेमार्फत चालू असून संयुक्त मोजणी होवून मा.सहाय्यक संचालक, नगर रचना यांचे अंतिम अभिप्रायावर प्रलंबित आहे. मे.उच्च न्यायालयात पर्वती स.नं. ६७ ते ७३ वनउद्यान प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार सदर प्रकरणी मा.मुख्य सभेची मान्यता होणे आवश्यक असल्याने पुणे पेठ कळस स.नं. ११५ पैकी येथील

अस्तित्वातील स्मशानभूमीलगत वाढीव स्मशानभूमीच्या भूसंपादनाकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र. ९८५ दि. २१/१०/१९९७ नुसार भूसंपादन प्रक्रिया चालू आहे. मात्र सदरचा प्रस्ताव विकास योजना बाह्य प्रस्ताव असल्याने त्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १३१**

संदर्भ :- १) मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे जा. क्र. मआ/उद्यान/१२० दि.३/६/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ३०४, दि. ८/६/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

कात्रज येथील स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालयामधील कोणताही आवडीचा प्राणी नागरिक किंवा संस्थांनी दत्तक घेतल्यास प्राप्त होणाऱ्या निधीतून प्राण्याची देखभाल व त्यांचे व्यवस्थापन अधिक चांगल्या रितीने राबविणेस निश्चितच फायदेशीर ठरणार असल्याने कात्रज येथील स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालयात प्राणी दत्तक/प्रायोजक योजना प्रायोगिक स्वरुपात सुरु करणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १३२**

संदर्भ :- १) मा.संतोष आरडे व मा.बंडु गायकवाड यांचे दि. १०/६/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ३२१, दि. २२/६/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

युरोपिय मराठी संमेलन दि. २३ जुलै २०१० ते २५ जुलै २०१० रोजी स्वित्झर्लंड (झुरीच) येथे होणार आहे. या संमेलनासाठी पुण्यातील पायल वृंद या संस्थेतील कलाकार १) शर्वरी जेमिनिस २) सोनाली कुलकर्णी ३) निकिता मोघे ४) केतकी महाजन ५) संस्कृती बालगुडे ६) भार्गवी चिरमुले ७)अश्विनी एकबोटे ८) मानसी नाईक ९) सुनिल महाजन यांना महाराष्ट्राची संस्कृती हा कार्यक्रम सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

पायल वृंद या संस्थेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात अनेक कार्यक्रम सादर केले आहेत, महाराष्ट्राच्या महानाईका हा त्यांचा विशेष कार्यक्रम फारच लोकप्रिय आहे.

तरी युरोपिय मराठी संमेलन दि. २३ जुलै २०१० ते २५ जुलै २०१० रोजी स्वित्झर्लंड (झुरीच) येथे होणाऱ्या संमेलनासाठी पुण्यातील पायल वृंद या संस्थेतील कलाकार १) शर्वरी जेमिनिस २) सोनाली कुलकर्णी ३) निकिता मोघे ४) केतकी महाजन ५) संस्कृती बालगुडे ६) भार्गवी चिरमुले ७)अश्विनी एकबोटे ८) मानसी नाईक ९) सुनिल महाजन यांना महाराष्ट्राची संस्कृती हा कार्यक्रम सादर करण्यासाठी जाण्या–येण्याचा विमान प्रवासासाठी र.रुपये ३,५०,०००/– खर्च करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

सदर विमान प्रवासाची तिकीटे मनपातर्फे वरील कलाकारांच्या नावे काढण्यात यावीत.

**विषय क्रं. १३३**

संदर्भ :- १) मा. बाबुराव चांदेरे व मा. ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. १९/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८८ दि. ४/५/२०१०.
३) मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/१२६ दि. ४/६/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. ३२४, दि. २२/६/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्र.२८ बाणेर बालेवाडी गावात पिण्याच्या पाण्याची नविन टाकी बांधणे व वितरण व्यवस्था तयार करणे या कामासाठी र.रु. ११९.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यांस मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २६, अ.क्र. ३(अ), शुध्द पाण्याच्या मुख्य नलिका टाकणे. | | |
| १) पान क्र. ३७, अ.क्र.१०४, वॉर्ड क्र. २८ सुस खिंड ते बालेवाडी क्रिडानगरी पर्यत मुख्य जलवाहिनी विकसित करणे. | ३४ लाख | --- |
| २) पान क्र. ३८, अ. क्र. १४९, वॉर्ड क्र. २८, स. नं. १७ येथे मुख्य जलवाहिनी टाकणे. | २५.५० लाख | --- |
| ३) शुध्द पाण्याच्या मुख्य नलिका टाकणे, (यादी एस–५), पान क्र. ४१, अ.क्र. ३७, वॉर्ड क्र.२८ बालेवाडी हॉटेल पॅन कॉर्ड जवस.नं७ याठिकाणी पिण्याच्या पाण्याची टाकी बांधली आहे.त्या टाकीपासून डोंगराच्या कडेने डॉ.श्रीधर कलमाडीसाहेब याच्या घरापर्यत ८ इंची पाण्याची लाईन टाकणे. | २५ लाख | --- |
| ४) पान क्र. ४५, अ. क्र. १९२, बाणेर स. नं. २२१ ते २४० मी. डी. पी. रोडवर मेडी पाईट ते रामनदी पाण्याची लाईन टाकणे. | ३५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र.२८ बाणेर बालेवाडी गावात पिण्याच्या पाण्याची नविन टाकी बांधणे व वितरण व्यवस्था तयार करणे. | --- | ११९.५० लाख |

**विषय क्र. १३४**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा. क्र. मआ/भवन/११५, दि. ३/६/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ३३८, दि. २२/६/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील आंबेडकरनगर झोपडपट्टी, गुलटेकडी, मार्केटयार्ड येथील आगीच्या दुर्घटनेतील जळीतग्रस्तांच्या पुनर्वसन प्रकरणी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) आंबेडकरनगर, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे येथील दि. २ मे २०१० रोजीच्या आगीच्या दुर्घटनेतील जळीतग्रस्तांचे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये केलेल्या पुनर्वसनास

२) सदर पुनर्वसनाकरिता माल पुरविण्याचे काम केलेल्या पुरवठादारांना मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे बिलापोटी एकूण र.रुपये ८८,२८,४०६/– च्या खर्चास

३) उपरोक्त खर्चाची रक्कम सर्व मा.सभासदांच्या वॉर्डस्तरीय निधीतून प्रत्येकी र.रुपये ६२,५००/– उपलब्ध करुन घेऊन ती संबंधित पुरवठादारांना अदा करण्यास

४) सर्व पुरवठादारांकडून माल व्यवस्थित व आवश्यक त्या प्रमाणात मिळालेला असल्याने आता त्याबाबत करारनामा करण्याची आवश्यकता नाही. सबब पुरवठादारांना बिले अदा करताना करारनाम्याची अट शिथिल करण्यास.

**विषय क्र. १३५**

संदर्भ :– १) मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे जा. क्र. मआ/ परवाना/१२४ दि. ४/६/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ३४४, दि. २२/६/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे शहरात आलेल्या स्वाईन फ्लु रोगाचे साथीचे वेळी नागरिकांनी घ्यावयाचे खबरदारी विषयक मार्गदर्शक सूचना देण्यासंबंधीची जाहिरात करणेसाठी फ्लेक्स बोर्ड लावणेबाबत हातोहात कोटेशन मागविले असता आलेल्या ३ कोटेशनपैकी मे.सरस्वती ग्राफीक्स यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचेकडून १० बाय ८ आकारमानाचे एकूण ६८ जाहिरात फ्लेक्स बोर्ड प्रति नग रुपये १,७००/– प्रमाणे करुन घेतले असून त्यांचे रक्कम रुपये १,१५,६००/– + व्हॅट त्यांना करार न करता आदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

(सदर काम तातडीने करुन घेणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)क अन्वये करुन घेण्यात आले आहे.)

**विषय क्रं. १३६**

संदर्भ :– १) मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई–३२ यांना मा. म. आ. यांचे जा.क्र. पापु/जलोत्सारण–स्वारगेट–६७ दि. २८/४/२०१० रोजीचे पत्र.

२) मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती इमारत, पुणे–१ यांचे जा.क्र. मुअ(पुणे)/प्राशा–चा ४/१३७६ दि. १९/४/२०१० चे पत्र.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/पापु जलोत्सारण/१३४ दि. ८/६/२०१० चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव क्र. ३४७, दि. २२/६/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे शहरात निर्माण होणारे संपूर्ण मैलापाणी प्रक्रिया करुन नदीमध्ये सोडणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

१) पुणे शहरात निर्माण होणारे संपूर्ण मैलापाणी गोळा करणे व प्रक्रिया करणेसाठीची योजना एनआरसीडीच्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करणेसाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांची नियुक्ती करणेस, त्यांचेकडून अहवाल तयार करुन घेणेस व महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या मागणीनुसार मानधन अदा करणेस

२) योजनेच्या पूर्वगणनपत्रकाच्या रक्कमेचे ३०% रक्कम मनपाच्या पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतुद करणेस

३) सदरची योजना दोन वर्षाच्या कालावधीमध्ये अंमलबजावणी करणेस

**विषय क्र. १३७**

संदर्भ :– १) मा.अशोक हरणावळ, मा.बंडु गायकवाड व मा.सुनिल टिंगरे यांचे दि.१५/६/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं. ३५६, दि. २२/६/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

श्री. साधु खेलबा कोळेकर हे पुणे विद्यापीठामध्ये भौतिक शास्त्रामध्ये अटॉमिक फोर्स मायर्कोस्कोपी, स्कॅनिंग टनेलिंग मायक्रोस्कोपी व थर्मी अयॉनिक व फिल्ड इमिशन, कार्बन नॅनो टूब या विषयावर पी.एच.डी. चा अभ्यास करीत आहेत. या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने बिजींग (चीन) मध्ये दि. २३/८/२०१० ते २७/८/२०१० मध्ये होणाऱ्या जागतिक चर्चासत्राकरीता भारतामधून श्री. साधु खेलबा कोळेकर यांची एकमेव निवड झालेली आहे. सदरचे चर्चासत्राकरीता र.रुपये २ लाखपेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे परंतू त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांना आर्थिक मदतीची अपेक्षा आहे. तरी श्री. साधु खेलबा कोळेकर यांना पुणे महानगरपालिकेतर्फे रुपये २ लाखाची आर्थिक मदत उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. १३८**

संदर्भ :– १) मा. बाबुराव चांदेरे व मा. शिवाजी बांगर यांचे दि. ५/४/२०१०.

२) स्थायी समिती ठराव क्र. ३४ दि. १३/४/२०१०.

३) मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी क्रं. मआ/उपआ(तांत्रिक)/१४८ दि. १४/६/१० ने पाठविलेला अभिप्राय.

४) स्थायी समिती ठराव क्र. ३६२, दि. २२/६/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त (वि)यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

वॉर्ड क्र.२८ मध्ये स.नं. ३३ व ३४ मधून जाणाऱ्या डी.पी. रोडवर ९ मी लांबीचे विद्यूत पोल पांढऱ्या फिटींगसह बसविणे करिता र.रू.१० लाख २) वॉर्ड क्रं. २८ बाणेर बालेवाडी स.नं. २८ ते स.नं. ६२ नॅशनल हायवेपर्यत २४ मीटरचा डी.पी. रोड विकसित होत असून सदर ठिकाणी ९ मी. लांबीचे विद्यूत पोल पाढऱ्या फिटींगसह बसविणेसाठी र.रुपये २० लाख ३) वॉर्ड क्रं. २८ मध्ये परिसरात पांढऱ्या फिटींगचे दिवे बसविणेसाठी र.रुपये १० लाख असे एकूण ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, १० ग विद्युत विभाग, पान क्रं. १२८, अ. क्रं. १० शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, ( यादी एस – ३) विद्युत विभागाकडील याद्या | | |
| १)पान क्र.२०६, अ.क्र.७१ वॉर्ड क्रं. २८ बाणेर तेजस्विनी सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर भूमिगत केबल टाकणे. | १० लाख | --- |
| २) पान क्र.२०६, अ. क्र. ७२, वॉर्ड क्रं. २८ मध्ये बाणेर विजयनगर कॉलनी येथे भूमिगत केबल टाकणे. | १० लाख | --- |
| ३) पान क्र.२०६, अ. क्र. ७४, वॉर्ड क्रं. २८ मध्यें बाणेर बालेवाडी येथे भूमिगत केबल टाकणे व विद्यूत पोल बसविणे | १० लाख | --- |
| ४) पान क्र.२०६ अ. क्र. ७५, वॉर्ड क्रं. २८ मध्ये वर्षा हॉटेलच्या कडेने भूमिगत केबल टाकणे, | १० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेली कामे</u>** | | |
| १) वॉर्ड क्र.२८ मध्ये स.नं. ३३ व ३४ मधून जाणाऱ्या डी.पी. रोडवर ९ मी. लांबीचे विद्यूत पोल पांढऱ्या फिटींगसह बसविणे | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्रं. २८ बाणेर बालेवाडी स. नं. २८ ते स. नं. ६२ नॅशनल हायवेपर्यत २४ मीटरचा डी. पी. रोड विकसित होत असून सदर ठिकाणी ९ मी. लांबीचे विद्यूत पोल पाढऱ्या फिटींगसह बसविणे | --- | २० लाख |
| ३) वॉर्ड क्रं. २८ मध्ये परिसरात पांढऱ्या फिटींगचे दिवे बसविणे | --- | १० लाख |

**विषय क्रं. १३९**

संदर्भ :– १) मा. सौ. चाँदबी नदाफ यांचे दि. ४/६/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ३९३, दि. २८/६/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्र.३९ मधील प्राथमिक उपचार केंद्राचे (दवाखान्याचे) उर्वरित काम करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र.१२२, अ. क्र. १०, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी एस–२), पान क्र.१९२, अ. क्र. ११३, वॉ. क्र. ३९ वाडीया कॉलेज मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे . | २५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| वॉ. क्र. ३९ मधील प्राथमिक उपचार केंद्राचे (दवाखान्याचे) उर्वरित काम करणे. | --- | २५ लाख |

**विषय क्रं. १४०**

संदर्भ :– १) मा.महापौर यांचे नसआ/१४९२ दि. २/६/२०१० चे पत्र.
२) मा.नगरसचिव यांचे क्र. १४९६ दि. २३/६/२०१० चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. ४००, दि. २८/६/२०१०.

---

मा.नगरसचिव यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेतर्फे पुणे फेस्टिव्हल इन काश्मिर महोत्सवाचे आयोजन रविवार, दिनांक ११ जुलै २०१० रोजी शेर ए काश्मिर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, श्रीनगर, काश्मिर प्रदेश येथे आयोजित करणेचे अनुषंगाने खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) पुणे महानगरपालिकेतर्फे पुणे फेस्टिव्हल इन काश्मिर, शेर ए काश्मिर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, श्रीनगर, काश्मिर प्रदेश येथे आयोजन करणेस

ब) पुणे महानगरपालिकेतर्फे पुणे फेस्टिव्हल इन काश्मिर अंतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन मा.महापौर यांनी मा.व्यवस्थापक, बालगंधर्व रंगमंदिर यांचेशी चर्चा करुन कमीत कमी दर देणाऱ्या व चांगले

सांस्कृतिक कार्यक्रम करणाऱ्या संस्थेकडून कार्यक्रम करण्यास
क) पुणे फेस्टिव्हल इन काश्मिर चे विविध सांस्कृतिक कार्यक्रमा करीता केलेल्या खर्चा प्रित्यर्थ मा. महापौर यांचे संमतीने रक्कम रूपये २०,००,०००/– ( रूपये वीस लाख फक्त ) पर्यन्तची खर्चाची बिले संबंधीतास अदा करणेस
ड) पुणे फेस्टिव्हल इन काश्मिर चे आयोजनास होणारा खर्च खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस

सन २०१० – २०११ चे अंदाजपत्रक, १. मुख्य देखरेख वसुली वगैरे, क. महानगरपालिका व स्थायी समिती, १. नगरसचिव यांचे कार्यालय, अ. क्र. REIIA 195 पुणे फेस्टिव्हल इन काश्मिर तरतूद रक्कम रूपये २०,००,०००/–( रूपये वीस लाख फक्त).

## विधी समितीचा ठराव

**विषय क्र. १४१**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उआ/से/१३७, दि.१०/६/२०१० चे पत्र.
२) विधी समिती ठ.क्र. १८, दि. १६/६/२०१०.

– – –

विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

सुरक्षा रखवालदार वर्ग – ४ (वे.श्रे.रू.४४००/– ते ७४४०/– + २३५०/– ग्रेड पे +मान्य भत्ते) या पदासाठी स्विमिंग, बॉक्सिंग व रनिंग या बाबींचा समावेश करुन पुन्हा जाहिरात देण्यास आणि भरतीची प्रक्रिया पुन्हा सुरु करण्यासाठी सदरचे विषयपत्र प्रशासनाकडे परत पाठविण्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. १४२**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.म.आ./उआ/से/११०, दि. २/५/२०१० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३६, दि.११/६/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडील हॉटमिक्स प्लॅन्ट ऑपरेटर या पदावर नेमणूकीबाबत मा.सेवक निवड समितीने शिफारस केलेल्या प्रतिक्षा यादीस व जागेची उपलब्धता, अनुशेष, आरक्षण इ. विचारात घेऊन सदर जागा रिक्त झाल्यावर प्रतिक्षा यादीवरील उमेदवाराची नेमणूक करण्यास मुं.प्रां. म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १ | श्री.भांगारे तेजस सुनिल | अज |

**विषय क्र. १४३**

संदर्भ :– १) मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/नअ/११२, दि. २/६/२०१० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३७, दि.११/६/२०१०.

–––

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाकडून विविध कारणामुंळे जागा संपादन करताना माहे एप्रिल २०१० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी. डी. आर. च्या माहितीची नोंद घेवून मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी. आर. झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोंढवा खुर्द,स.नं. ११/२ बी +३, ११/२ बी +३/१, | प्ले ग्राऊंड १ | अझम फकीरभाई पानसरे | सी | ३६००.०० | ३८६९ | १३.४.२०१० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ११/२ बी +३/३,<br>११/२ बी +३/४,<br>११/२ बी +३/५, | | | | | | |
| २ | हडपसर,स.नं.१६१,<br>हि.नं.१९ बी | १२<br>मी.डी.पी.<br>रस्ता | श्री.उत्तम<br>एन.बनकर व<br>इतर | सी. | ८०.०० | ३८६५ | १५.४.२०१० |
| ३ | कात्रज स.नं.१० पैकी | एस.आर.<br>ए. | जयंत शहा<br>जयराज<br>डेव्हलपर्स<br>युनीट ३ | सी. | ९९५५.४९ | ३८७२ | १९.४.२०१० |
| ४ | घोरपडी स.नं.<br>७०अे/५/१ | ॲमिनिटी<br>स्पेस | १) उमाकांत<br>आर. गोरडे<br>२) सोमनाथ<br>उर्फ विलास<br>आर.गोरडे<br>३) शशिकला<br>एस.निंबाळकर<br>४) वसुदा<br>उर्फ दमयंती<br>टाकळकर<br>५) शोभना<br>एस.काकडे<br>६) रजनी<br>व्ही. शेडगे<br>७) बीनदू<br>पी.शेटे<br>८) विजया<br>वाय गोरडे<br>९) आनंद<br>वाय गोरडे<br>१०) अनुरधा<br>वाय गोरडे<br>( पीएएच)<br>रविराज<br>देविकेश<br>कन्स्ट्रक्शन<br>तर्फे<br>१) रविंद्र एर्न<br>संकला<br>२) शैलेश<br>आर.शहा<br>३) देविचंद<br>एम.जैन | बी | २४५४.९२५ | ३८८५ | २१.४.२०१० |
| ५ | कसबा पेठ,सि.टी.<br>एस.नं.८९२ ब | एस.आर.<br>ए. | मे.क्यूबा<br>प्रापर्टीज<br>शेख मोहमद<br>फिरदौस<br>शब्बी | ए | १९७.३४ | ३८६४ | २२.४.२०१० |
| ६ | भवानी पेठ स.नं.<br>५२७ कासेवाडी | एस.आर.<br>ए. | मे.सौभाग्यलक्ष्मी<br>डेव्हलपर्स | ए | ५५२७.३६ | ३८७६ | २२.४.२०१० |
| ७ | घोरपडे पेठ | एस.आर. | मे.आर.के.असो | ए | ७२७.८४ | ३८७१ | २६.४.२०१० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सि.टी.एस. नं.३३८/अे/३ | ए. | .रियाज इस्माईल सय्यद | | | | |
| ८ | नानापेठ सि.टी.एस.नं. १०४६ ते १०५४ | एस.आर. ए. | ईश्वर कन्स्ट्रक्शन प्रा.लि.मॅनेजिंग डायरेक्टर श्री.ईश्वर सी.परमार | ए | ५२५३.४६ | ३८८७ ते ३८९६ | २७.४.२०१० |
| ९ | हडपसर स.नं.१०६ अे/१७ अे | 20 m . D.P & EWS | अनिल गोगावले (पीएएच) श्री.अशोक बा.टाके व इतर | सी | २६५३.४६ | ३८६६ | २८.४.२०१० |
| १० | भवानी पेठ सि.टी. एस.नं.७८६ + ७८७ | एस.आर. ए. | अमू डेव्हलपर्स ॲन्ड प्रमोटर्स श्री.केतन जयंतीलाल विरा. | ए | २६८०.०० | ३८८६ | २९.४.२०१० |

<u>विषय क्र. १४४</u>

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासनाचे सुधारीत निर्देश क्र. TPB ४३०२/८१८/ce–८८/२००२/UD–११ दि.१७/०३/२००३ व नोटीफिकेशन TPB १८०७/१७३०/CR–८५०/०७/UD–१३ १४/०९/२००७.

२) शासनाचे आदेश क्र. TPB/४३०९/४१९/CR-२२/०९/UD-११ दि.२७/०२/०९.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नगरअभि /१६७, दि. २६/६/२००९ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३८, दि.११/६/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

बायोटेक्नोलॉजी पार्क म्हणजेच जैव तंत्रज्ञानाचा संबंध वनस्पती, प्राणी आणि सुक्ष्म जीव यासह सजीव प्रणालीशी येतो. जीवनास आधार देणाऱ्या जैविक प्रक्रिया पासून जैव तंत्रज्ञानास बळ प्राप्त होते. सजीव सेंद्रीय किंवा त्याचा भाग आणि इन्झाइन्स प्रोटीन्स, जी नैसर्गिक रित्या उपलब्ध आहेत अथवा सजीव प्रणालीतून काढून त्याचा वापर होतो अशा कोणत्याही पध्दतीचा अंतर्भाव या तंत्रज्ञानात होतो. अशा पध्दतीचा उपयोग हा उत्पादनासाठी किंवा उत्पादनात बदल करण्यासाठी वनस्पती किंवा प्राणी यांची उत्पादन क्षमता विकसित करण्यासाठी तसेच विशेष प्रयोजनासाठी सूक्ष्म सेंद्रिय विकसित करण्यासाठी होतो. उदयास येणाऱ्या जैव तंत्रज्ञानात एकत्रित डी.एन.ए. सेल फ्युजन व एब्रिया मॅन्युप्युलेशन यांचा वापर होतो. कृषि, संवर्धन, आरोग्य, पर्यावरण संरक्षण वगैरे व्दारे जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी परिणामकारक रित्या बदलण्याची क्षमता जैव तंत्रज्ञानात आहे. जैव तंत्रज्ञानातील काही क्षेत्रात केवळ भारतातच नव्हे जागतिक स्तरावर आघाडी घेण्याची क्षमता निर्माण होणे करिता महाराष्ट्राचे जैव तंत्रज्ञान धोरण जाहिर केले आहे.

संदर्भ क्र. १ अन्वये, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ महाराष्ट्र जैव तंत्रज्ञान धोरणाच्या अनुषंगाने करावयाच्या विकास नियंत्रण नियमावलीत कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत सुधारित निर्देश क्र. टीपीबी – ४३०२/८१८/प्र.क्र.८८/२००२/नवि –११, दि.१७/०३/२००३ चे दिलेले होते. तद्‌नंतर त्या अनुषंगाने एम.आर.टी.पी. १९६६ मधील कलम ३७ (२) अन्वये पत्र क्र. टीपीबी – १८०७/७३०/सीआर–८५०/०७/युडी–१३, दि.१४/०९/२००७ ने नोटीफिक्रेशन असून त्यामध्ये पब्लिक बॉडीज् उदा. म्हाडा सीब्झ्, सिकॉम, सिडको इ. ने स्थापन केलेल्या जैवतंत्रज्ञान युनिटस् करिता प्लॉट समोरील रस्ता १२.० मी. पेक्षा जास्त असावा. तसेच या युनिटस्करिता अतिरिक्त १०० टक्के एफएस.आय.प्रस्तावित केलेला असून, ५० टक्के प्रिमियम शासनास देणेत यावा असे अधिसूचित केले आहे. सोबत सदर नोटिफिकेशनची प्रत जोडली आहे.

आता संदर्भ क्र. २ अन्वये शासनाचे आदेश क्र. TPB/4309/419/CR-22/09/UD-11 दि.२७/०२/०९ ने खाजगी Biotechnology Park ना आय.टी. पार्कच्या धर्तीवर अतिरिक्त एफएस.आय. देणेसंदर्भांत एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १५४ अन्वये पुढील आदेश दिलेले असून उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे कळविले आहे.

## DIRECTIONS

1. The said Authorities shall initiate modification to their respective Regulation as detailed out in schedule appended hereto\
2. The said Authorities shall publish the requisite notice inviting suggestions/objections over the said modification within a period of 90 days from the date of issue of this order.
3. After completing the legal procedure, as laid down under section 37(1) of the said Act, the said modification proposal shall be submitted to the Government for final sanction.
4. Pending sanction to these modifications by the Government under section 37 (2) of the said Act, the aforementioned modifications shall come into effect forthwith.
5. This direction will supercede earlier Government directives vide order no. TPB 4302/818/CR-88/2002/UD-11 dated 10th October, 2002, 17th March, 2003 and the existing provision in this regard in the Development Control Regulation of any Planning Authority.

(Accompaniment to Urban Development Departments Order No. TPB 4309/419/CR – 22/09/UD – 11 dated 27th February, 2009.)

| Modification No. | Subject | Version of modification |
|---|---|---|
| 1 | Definitions | The Biotechnology Units/Parks shall mean Biotechnology units/parks which are certified by the Development Commissioner (Industries) or any officer authorized by him in his behalf. The biotechnology park and unit/units outside park shall have minimum land area of 2 acres or 20000 sq.ft. built up area. The said requirement of 20000 sq. ft. shall be as per normal permissible FSI and without considering permissible additional FSI/TDR/Free of FSI area. |
| 2 | Biotechnology Units/Park to be allowed in Service Industries Zone (I-1) | 'Biotechnology Units/Park shall be permitted in I-1 Zone and Services Industrial Estates on all plots fronting on roads having width more than 12 metre'' |
| 3 | Biotechnology Units/Park to be allowed in General Industries Zone (I-2) and Special Industrial Zone (I-3) | "Biotechnology Units/Park shall be permitted on all plots fronting on roads having width more than 12 meter." |

| | | |
|---|---|---|
| 4 | Biotechnology Units/Park to be allowed in No Development Zone/Green Zone earmarked in the Development Plan. | I) Biotechnology units/parks shall be permitted in No Development Zone/Green Zone subject to following conditions :-<br>(i) Maximum FSI limit shall be 0.20 and as far as possible the development shall be at one place of the total land.<br>(ii) The ground coverage shall not exceed 10% of the area of plot.<br>(iii) Tree plantation shall be done at the rate of 500 Trees/Ha. On the remaining land excluding the built up area and the surrounding open space/utility space.<br>(iv) The maximum height of buildings shall not exceed 24 mt.<br>(v) Essential residential development for the staff/officer's accommodation shall be permitted upto the extent of 33% of the permissible built up area.<br>(vi) These users shall be permitted in No Development Zone, within a distance of 3 km. from the adjoining developable zone.<br>(vii) Development in plots affected by CRZ area, shall be permissible subject to the notification issued by MOEF regarding CRZ. |
| 5 | Additional FSI to Biotechnology Units/Park | Subject to approval by Director of Industries, the Commissioner/ Chief Officer or as the case may permit the floor spaces indices specified in these regulations to be exceeded to the extent of 100% over and above the permissible FSI (including for Biotechnology Units/Park located in NDZ / Green Zone/Agriculture Zone proposed in the Development Plan) for biotechnology units/parks subject to following conditions :<br>i) Out of total built up area minimum 90% shall be used for Biotechnology purpose and maximum 10% (by deducting parking spaces) shall be used for ancillary users such as specified in the Govt. Resolution of Industry, Energy and Labour Deptt. No. BTP 2008 /CR-1608/Ind-2, dated 10/2/09<br>ii) Additional FSI to Biotechnology units would be available to Biotechnology Parks duly approved by the Directorate of Industries and after observance of all the regulation of environment.<br>iii) Parking spaces, as per the provision of Development Control Regulation shall be provided subject to minimum requirement of the one parking space per 100 sq. mt. builtup area.<br>iv) The additional FSI shall be granted upon payment of premium which shall be paid in the manner as may be determined by the Government. Such premium shall be recovered at the rate of 25% of the present day market value of the land under reference as indicated in the Ready Reckoner.<br>v) 25% the total premium shall be paid to the Govt. and remaining 75% amount shall be paid to the said Authority.<br>vi) The premium so collected by the Planning Authorities shall be primarily used for development/upgradation of off site infrastructure required for the Biotechnology Parks. |

| | | |
|---|---|---|
| | | vii) In the event, the developer comes forward for provision of such off site infrastructure at his own cost, then the said Planning Authority shall determine the estimated cost of the works and shall also prescribe the standards for the work. After completion of the works the said Planning Authority shall verify as to whether the same is as per prescribed standards and thereafter, by deducting the cost of works, the balance amount of premium shall be recovered by the said Planning Authority.<br>viii) No condonation in the required open spaces, parking and other requirement prescribed in the regulations shall be allowed in case of additional FSI.<br>ix) Development of biotechnology park shall be done as per the guidelines issued by Industries. Department vide the said resolution. |

सदरची तरतूद डी.सी.नियमामध्ये समाविष्ट करणेसाठी विकास नियंत्रण नियमालीमध्ये एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

या कार्यवाहीचा भाग म्हणून दैनिक वर्तमान पत्र व शासकीय राजपत्रात जाहिर प्रकटन देऊन नागरिकांच्या हरकती व सुचना मागविण्यासाठी मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. १४५</u>

संदर्भ :- १) मा. उपसचिव,नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.टीपीएस/३००५/९८७/ प्रक्र.१९४/२००५/नवि-३०, दि. १५/४/२००६.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२०, दि. २५/८/२००६.
३) मा.मुख्य सभा ठराव क्र. ३९७, दि.७/१२/२००६.
४) मा.महा.आयुक्त मआ/न.अ./५४, दि. २९/४/२०१० चे पत्र.
५) मा.सुभाष जगताप, मा. दत्तात्रय ससाणे, मा.सौ.शैलजा खेडेकर, मा.सुनिल झगडे, मा.विष्णू हरिहर, मा.सुनिल गोगले, मा. शैलेश चरवड यांची दि. १४/५/१० ची उपसूचना.
६) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. २४, दि.१४/५/२०१०.
७) मा.राजेंद्र गोरडे यांचे दि. २८/५/२०१० चे पत्र.
८) मा.सुभाष जगताप व मा. दत्तात्रय ससाणे यांची दि. ११/६/२०१० ची उपसूचना.
९) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३९, दि.११/६/२०१०.

---

मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले व शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन -

संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये ना विकास विभागात पेट्रोल पंप/गॅस फिलींग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेबाबत निदेश दिलेले आहेत. महानगरपालिकेच्या विकसित भागात पेट्रोल पंप/ गॅस फिलींग स्टेशन यांचा वापर अनुज्ञेय करणे धोकादायक होऊ शकते. यास्तव पेट्रोल/ गॅस फिलींग स्टेशन यांचा वापर ना विकास विभागात अनुज्ञेय करणे योग्य होईल असे नमुद केलेले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावली मध्ये ना विकास विभागात पेट्रोल पंप / गॅस फिलींग स्टेशन उभारण्याबाबतची तरतुद समाविष्ट नाही. विकास नियंत्रण नियमावलीत ना विकास विभागात पेट्रोल/ गॅस फिलींग स्टेशन यांचा वापर अनेज्ञेय करण्याबाबतची तरतुद समाविष्ट करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेबाबत या निदेशानुसार विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १३.४.३.४ नव्याने नियम समाविष्ट करणे आवश्यक आहे.

संदर्भ क्र. २ अन्वये मा. शहर सुधारणा समिती व संदर्भ क्र. ३ अन्वये मा. मुख्य सभा यांनी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १३.४.३.४ नुसार शेती विभागामध्ये पेट्रोल/ गॅस फिलींग स्टेशन खालील अटीवर अनुज्ञेय केले जातील असा ठराव केला आहे.

**अट क्रं.१ :–** प्रस्तावित भूखंडाचे क्षेत्रफळ किमान २००० चौ.मी. असावे. रस्त्याकडील बाजूस प्लॉटची रुंदी कमीत कमी ३० मी. असावी.

**अट क्रं.२ :–** या भूखंडावर कमाल ०.०४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील.

**अट क्रं.३ :–** या भूखंडावर फक्त तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय राहील.तसेच या प्लॉटवर पेट्रोल पंप / गॅस फिलिंग स्टेशन या व्यतिरीक्त सेवा सुविधा साठी लागणारे बांधकाम अनुज्ञेय राहील तसेच स्वच्छतागृह चटई क्षेत्र मुक्त राहील.

**अट क्रं.४ :–** प्रस्तावित भूखंड राष्ट्रीय महामार्ग,राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग व किमान १८ मी रुंद रस्त्यावर असावा.

**अट क्रं.५ :–** केंद्र शासनाच्या पेट्रॉलियम विभागाचे तसेच चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोसिव्ह यांचे संमतीपत्र आवश्यक आहे.

**अट क्रं.६ :–** प्रचलित नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अन्य संबंधित विभागाकडे ना हरकत प्रमाण पत्र आवश्यक राहील तसेच सेवा रस्ता/इमारत रेषा नियंत्रण रेषा इ. बाबतीत शासन नियंत्रण सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. आर. बी. डी. १०८१/८७१/रस्ते–७, दिनांक ९/३/२००१ व त्यानंतरची संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके बंधनकार राहतील.

**अट क्रं.७ :–** केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवेज् कडील दि.२५ सप्टेंबर २००३/दि.१७ ऑक्टोंबर २००३ चे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रातील सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

D.C.Rule.13.4.3.4.

Petrol pump / gas filling station may be permitted in non development zone provided that .

1. Minimum area of plot shall be 2000 sq mt. with minimum road side frontage of 30 mt.
2. Maximum permissible F.S.I. shall be 0.04 of the plot.
3. Only ground floor structure shall be permitted . structure for allied uses other than Petrol pump / gas filling station will be permitted and toilet block Will be permitted free of F.S.I.
4. Proposed plot shall be fronting on National high way State high way Major district road and minimum 18 m. wide road
5. N.O.C. of petroleum ministry, central government and chief controller of explosive shall be obtained .
6. N.O.C. of P.W.D. and other concern department shall be obtained. as per P.W.D. circular no. R.B.D. /1081/871/ roads dated 9/3/2001 and other concern circular regarding service road , building line & control line shall be binding .
7. Circular of Ministry of road transport and highway , central government department dt. 25 th September 2003/17 th October 2003 should be applicable for the permission .

स.क्र. ३ अन्वयेच्या मा. मुख्य सभा ठरावानुसार मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत, इंग्रजी वृत्तपत्र सकाळ टाईम्स मध्ये दि. १८/०९/२००८ रोजी जाहीर प्रकटन दिलेले होते. त्यास अनुसरुन श्री. अनिल जगन्नाथ शिंदे यांनी हरकत नोंदविलेली होती. दि. ०८/१२/२००८ रोजी हरकतदार श्री. अनिल जगन्नाथ शिंदे तसेच श्री. विश्वास कुलकर्णी, व्हाईस प्रेंसिडेंट, आर्किटेक्ट, इंजिनिअर, सर्व्हेअर असोसिएशन श्री. सतिश मगर, व्हाईस प्रेसिडेंट, प्रमोटर ॲण्ड बिल्डर असोसिएशन यांना सुनावणी देण्यात आली होती. श्री. सुभोजित सरकार, क्लस्टर मॅनेजर, महाराष्ट्र शेल इंडिया मार्केटिंग प्रा. लि. सुनावणी वेळी उपस्थित नव्हते. यापूर्वी दिलेल्या जाहीर प्रकटनांमध्ये अट क्र. १ व ३ मध्ये काही माहिती नजर चुकीने नमुद करणे राहुन गेल्याने दि. १७/०९/२००९ रोजी दैनिक लोकमत या मराठी वृत्तपत्रामध्ये तसेच सकाळ टाईम्स या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये, तसेच मे. शासन राजपत्रात दि. १०/०९/२००९ रोजी शुध्दिपत्रक देण्यात आले होते.

त्यास अनुसरुन हरकतदार श्री. अनिल शिंदे यांनी हरकत नोंदविली असून त्यांना दि. ०४/१२/२००९ रोजी सुनावणी देण्यात आलेली आहे. मा. महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबत सुनावणी तक्ता जोडला आहे.

एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६चे कलम ३७(१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही पूर्ण झाली असल्याने प्रकरणी मे. शासनाचे अंतिम आदेश मिळणेबाबत मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

तसेच संदर्भ क्रमांक ७ चे उपसूचनेनुसार –

पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हरीतपट्टा, शेती विभागासह ना विकास व डोंगरमाथा डोंगर उतारावर पेट्रोल /गॅस फिलींग स्टेशन अनुज्ञेय करण्यात यावा तसेच अट क्र.१ मध्ये प्रस्तावित भुखंडाचे क्षेत्रफळ किमान १००० चौ.मी.असावे.

( टिप – शहर सुधारणा समिती ठ.क्र. २४, दि.१४/५/२०१० चा निरस्त करणेत येत आहे. )

**<u>विषय क्र. १४६</u>**

संदर्भ :– १) नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.टी.पी.एस.१८०३/२०४५/नवि–१३, दि. २४/८/०४ चे आदेश.
२) मा. मुख्य सभा ठराव क्र.९५, दि. १२/८/०९.
३) मा.महा.आयुक्त मआ /न.अ. /६३, दि.६/५/२०१० चे पत्र.
४) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ४३, दि. २५/६/२०१०.

–––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारत घेऊन तसेच शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये मा.अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कोथरूड स.नं.१२३ पार्ट + १२४ पार्ट या मिळकतीमधील १२.०० मी.रूंदीचा डी.पी.रस्ता रद्द करून ती जागा निवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७ ( १ ) अन्वये फेर बदलाची कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव शासनास सादर करणे विषयी कळविले होते. सदरचे पत्रासोबत जोडलेल्या भाग नकाशामध्ये सदरचा रद्द करावयाचा १२.०० मी.रूंदीचा रस्ता इंग्रजी एम–एन या आदयाक्षरांनी दर्शविलेला होता.

त्यानुसार खात्यामार्फत दि.१२/१२/०७ रोजी मा.मुख्य सभेस विषयपत्र सादर करण्यात आले होते.सदरचे विषयपत्रास मा.मुख्य सभेने ठराव क्र.९५, दि.१२/८/०९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार नागरिकांच्या हरकती–सुचना मागविण्यासाठी पुणे म.न.पा.मार्फत वर्तमान पत्रात जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यात आले होते. सदरच्या जाहिर प्रकटनाच्या एक महिन्याच्या मुदतीत एकूण चार गृहरचना संस्थानी हरकतीची पत्रे दाखल केलेली आहेत. त्याबाबतचा तपशील व संबंधित गृहरचना संस्थेचे म्हणणे सोबतच्या तक्त्या प्रमाणे आहे.

प्रकरणी आलेल्या हरकती सूचना व प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी संबंधितांनी उपस्थित केलेले मुद्दे या आधारे एम.आय.टी.संस्थेलगत असलेल्या सावली सोसायटीच्या ओपन स्पेसमध्ये असलेल्या मुलांचे क्रिडांगण ( सी.पी.जी.) या आरक्षणापर्यंत पोहोच रस्त्यासाठी सदरचा १२.०० मी.डी.पी.रस्ता कायम ठेवणे योग्य होईल, असे खात्याचे मत आहे त्यानुसार सदरचा रस्ता रद्द करु नये.

यानुसार राज्यशासनास प्रस्ताव सादर करणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## महिला बाल कल्याण समितीचे ठराव

**<u>विषय क्र. १४७</u>**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/उआ(ज)/से/३८,दि.२०/४/२०१० चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ९, दि. ९/६/२०१०.

–––

मा. अति. महा. आयुक्त ( वि ) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य कार्यालयाकडील मोकादम (सुधारित वेतन श्रेणी ५२०० – २०२०० + ग्रेड पे +मान्य भत्ते) या वर्ग–४ च्या हुद्‌द्याची रिक्त पदे बढतीने भरणेसाठी,मा.अति.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबत सादर केलेल्या निवडयादी/प्रतिक्षायादीवरील अशा एकूण उमेदवाराची मागासवर्गीय आरक्षण अनुशेष, जागांची उपलब्धता, शासनाकडील आदेश व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून वेळोवेळी नेमणूक करणेस तसेच एखादा उमेदवार सदर हुद्दयावर मुदतीत हजर न झाल्यास अगर हजर होण्यास नकार दिल्यास त्याचे निवडयादी/प्रतिक्षायादीतील नाव व नेमणूक रद्द करण्यास व त्यापुढील निवडयादी/प्रतिक्षा

यादीवरील उमेदवारांची नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नेमणूक करणेस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. १४८</u>**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/उआ(ज)/से/३९,दि.२०/४/२०१० चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १०, दि. ९/६/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त ( वि ) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या नगर अभियंता कार्यालयाकडील ( आरोग्य खाते सोडून ) मोकादम (सुधारित वेतन श्रेणी ५२०० – २०२०० + ग्रेड पे +मान्य भत्ते) या वर्ग–४ च्या हुद्द्याची रिक्त पदे बढतीने भरणेसाठी,मा.अति.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबत सादर केलेल्या निवडयादी ६९ / प्रतिक्षायादी ४९ अशा एकूण ११८ उमेदवाराची मागासवर्गीय आरक्षण अनुशेष, जागांची उपलब्धता, शासनाकडील आदेश व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून वेळोवेळी नेमणूक करणेस तसेच एखादा उमेदवार सदर हुद्दयावर मुदतीत हजर न झाल्यास अगर हजर होण्यास नकार दिल्यास त्याचे निवडयादी / प्रतिक्षायादीतील नाव व नेमणूक रद्द करण्यास व त्यापुढील निवडयादी /प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांची नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये नेमणूक करणेस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. १४९</u>**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उआ/से/१०३०, दि.२९/३/२०१० चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ११, दि. ९/६/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त ( वि ) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना कार्यालयाकडील समाजसंघटक या पदावर नेमणूकीबाबत मा. सेवक निवड समितीने शिफारस केलेल्या निवड/प्रतिक्षा यादीस व त्या यादीवरील उमेदवारांच्या, जागांची उपलब्धता, अनुशेष, आरक्षण इ. विचारात घेऊन सदर जागांवर नेमणूका करण्यास मुं.प्रां.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षा यादी ही निवड यादीवरील उमेदवार समाजसंघटक या पदावर रूजू झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील. मात्र एक वर्षानंतर ती प्रतिक्षा यादी संपुष्टात आली आहे असे समजण्यात येईल.

**<u>– निवडयादी –</u>**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १ | श्रीमती कणकुरीकर मंजुषा श्रीनिवास | खुला |

**<u>– प्रतिक्षायादी –</u>**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १ | श्रीमती बदामीकर सुलभा मनोहर | खुला |

**<u>विषय क्र. १५०</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उआ/से/१०, दि. ३/४/२०१० चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १२, दि. ९/६/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना कार्यालयाकडील प्रकल्प अधिकारी या पदावर नेमणूकीबाबत मा.सेवक निवड समितीने शिफारस केलेल्या निवड/प्रतिक्षा यादीस व त्या यादीवरील उमेदवारांच्या, जागांची उपलब्धता, अनुशेष, आरक्षण इ. विचारात घेऊन सदर जागांवर नेमणूका करण्यास

मुं.प्रां.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षा यादी ही निवड यादीवरील उमेदवार प्रकल्प अधिकारी या पदावर रूजू झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील. मात्र एक वर्षानंतर ती प्रतिक्षा यादी संपुष्टात आली आहे असे समजण्यात येईल.

– निवडयादी –

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १) | श्री.पाटील वसंत पांडुरंग | खुला |
| २) | श्री.चव्हाण रामदास रायाजी | अज |

– प्रतिक्षायादी –

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १) | श्री.भोसले हनुमंतराव सोपानराव | खुला |
| २) | श्री.पोटे जावजी किसन | अज |

**विषय क्र. १५१**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांचे जा.क्र.मआ/उआ/से/१५, दि. ८/४/२०१० चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १३, दि. ९/६/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे सॅनिटरी इन्स्पेक्टर वर्ग – ३ ( वेतनश्रेणी रू.४५००/– ते रू.७०००/– + मान्य भत्ते ) ( नविन वेतनश्रेणी रू.५२००/– ते रू.२०२००/– + ग्रेड पे रू.४१५०/– + मान्य भत्ते ) या हुद्याची रिक्त पदे भरणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवड / प्रतिक्षायादीवरील उमेदवारांची नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

उपरोक्त निवड/प्रतिक्षायादी मनपा सभेच्या मान्यतेच्या ठरावाचे दिनांकापासून जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल त्यानंतर ती संपुष्टात आली असे समजण्यांत येईल.

– निवडयादी –

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा गट | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती पवार प्रियांजली परशुराम | खुला | महिला |
| २) | श्री. भोईर विजय खेवजी | अनुसूचित जमाती | |
| ३) | श्री. चव्हाण संदीप बाबुलाल | अनुसूचित जमाती | |

– प्रतिक्षायादी –

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा गट | समांतरआरक्षण |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती साळुंके चैताली अविनाश | खुला | महिला |
| २) | श्री.परदेशी कानिफनाथ लक्ष्मण | खुला | |
| ३) | श्री.शितोळे प्रविण हनुमंत | खुला | |
| ४) | श्री.साळुंके संजय खेमचंद (मनपा सेवक ) | खुला | |
| ५) | श्रीमती कोथेरे लक्ष्मी धावजी | अ.ज.( गुणवत्तेनुसार खुल्या गटातून ) | महिला |
| ६) | श्री.उभे मनोहर चिंधू | अनुसूचित जमाती | |

**विषय क्र. १५२**

संदर्भ :– १) मा. सौ. कविता वैरागे यांचे दि. १३/५/२०१० चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १४, दि. ९/६/२०१०.

–––

महिला बाल कल्याण समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ९८ सॅलिसबरी पार्क मधील ढोले मळा २९ प्राथमिक मुलींची/८ बी मुलांची २५ उर्दु मुलांची या शाळा इमारती मध्ये माध्यमिक शाळा जून २०११ पासून मुलींच्या साठी इयत्ता ८ वी चा वर्ग त्वरित सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १५३**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उआ/से/९७, दि. २९/५/२०१० चे पत्र.

२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १६, दि. ९/६/२०१०.

–––

मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे म.न.पा.प्रशासनाचे आरोग्य खात्याकडील सिनिअर नर्स ( वेतन पे बॅन्ड रू.९३०० ते रू.३४८०० + ग्रेड पे रू.५२०० + मान्य भत्ते ) या हुद्याच्या रिक्त जागांवर बढतीने नेमणुका करण्यासाठी खालील प्रमाणे शिफारस केलेल्या निवड/प्रतिक्षायादीस तसेच त्यावरील सेवकांना दिलेला क्रम, मागासवर्गीय अनुशेष/ आरक्षण, शासनाकडील वेळोवेळीचे आदेश इत्यादी सेवकवर्ग विषयक बाबींचा विचार करून मा.महा.आयुक्त यांनी वेळोवेळी बढतीने नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) प्रमाणे मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**– निवडयादी –**

| अ.क्र. | सेवकाचे नांव हुद्दा व वेतनश्रेणी | ज्युनिअर नर्स या जागेवरील नेमणूक दिनांक | जातीचा गट |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती चासकर सुचेता सुनिल, ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | १६ /१/ १९८६ | खुला |
| २) | श्रीमती चौरे रोहिणी सोपान, ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | २३ /१/ १९८६ | इमाव |
| ३) | श्रीमती मिसाळ लिना सुधाकर, ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | २१ /४/ १९८६ | इमाव |
| ४) | श्रीमती वाघमारे साधना चंद्रकांत, ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | २५ / ४ /१९८६ | खुला |
| ५) | श्रीमती नलावडे विद्या अरूण, ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | ५ / ५ /१९८६ | खुला |
| ६) | श्रीमती गायकवाड इंदुमती अर्जुन , ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | १४ / ५ / १९८७ | अजा |

**– प्रतिक्षायादी –**

| अ.क्र. | सेवकाचे नांव हुद्दा व वेतनश्रेणी | ज्युनिअर नर्स या जागेवरील नेमणूक दिनांक | जातीचा गट |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती श्रोत्रिय स्नेहल सुनिल , ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | २० / ६ /१९८६ | खुला |
| २) | श्रीमती वानखेडे उर्मिला राजेंद्र, ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | १ / ७ /१९८६ | इमाव |
| ३) | श्रीमती मलगुंडे सुमती शहाजी ( सोडनवार ) ज्युनिअर नर्स, ( रू.९३०० ते ३४८०० + ग्रेड पे रू.४५०० + मान्य भत्ते ) | २७/ ७ /१९९८ | भज – क |

**विषय क्र. १५४**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/उआ/से/१०७, दि. ३१/५/२०१० चे पत्र.

२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १८, दि. ९/६/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारत घेऊन–

पुणे मनपाच्या आरोग्य खात्याकडील डार्करूम असिस्टंट वर्ग – ३ ( वे.श्रे.रू.५२०० ते २०२०० + ग्रेड पे २९०० + मान्य भत्ते ) या पदावरील नेमणुकीबाबत शिफारस केलेल्या निवड / अतिरिक्तयादी खालील उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, आरक्षण /अनुशेष इ. बाबी विचारत घेऊन मा.महा.आयुक्त यांनी नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) प्रमाणे मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

निवडयादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री.साळुंके गणेश हिरामण | विजाभज |
| २) | श्री. सुर्यवंशी भरत गोटिराम | अज |

अतिरिक्त उमेदवार यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री. तुंबारे लक्ष्मीकांत रमेश | विजाभज |

## मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र

विषय क्रं. १५५

पुणे मनपा प्रशासनाकडे '' उप आयुक्त'' या पदावर महाराष्ट्र शासनाकडील श्री. मधुकांत गरड यांची महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पीएमसी – ३००९/मुमंस–६६१/प्र.क्र.४६४/०९/नवि–२२, मंत्रालय, मुंबई ३२, दि. ६/५/२०१० नुसार प्रतिनियुक्ती करण्यात आल्याचे व त्यांना दिनांक ११/५/२०१० रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी रुजू करुन घेऊन त्यांचेकडे उपायुक्त (विभागीय कार्यालय क्र. ४) या पदाचे संपूर्ण कामकाज सोपविण्यात आल्याबाबत मा. महा. आयुक्त यांचे जावक क्र.मआ/उआ/से/१५४, दि.१६/६/२०१० चे पत्र.

## मा. सभासदांचा प्रस्ताव

विषय क्र. १५६

संदर्भ :– मा. दिलीप बराटे व मा. ज्ञानेश्वर शिंदे यांची (सूचना दि. २९/६/२०१०.)

–––

पुणे महानगरपालिका हद्दीबाहेरील आजू बाजूच्या ४० कि. मी. परिसरामध्ये पुणे महानगर नियोजन समितीची शासनाने स्थापना केली आहे. भविष्यामध्ये महानगरपालिकेच्या आजू बाजूची लोकसंख्या झपाट्याने वाढणार आहे. त्याचप्रमाणे नागरीकरण ही फार मोठ्या प्रमाणात होणार आहे. या नागरीकरणाचा विचार केल्यास येथील जमीन वापर, वाहतुक व्यवस्था, नैसर्गिक संसाधने याचा विचार करावा लागेल.

या करिता शासनाने त्वरीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ( पी. एम. आर. डी. ए. ) ची स्थापना करावी. या कामी पुणे महानगरपालिकेने कार्यवाही करुन याबाबत राज्य शासनाकडे शिफारस करावी.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
**शिवाजीनगर, पुणे ४११००५.**
**दिनांक :– ७/७/२०१०.**

**सुनिल पारखी,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**